# मृदा परीक्षण विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज (स्वायत्त) मध्ये रसायानशास्त्र विभागातर्फे मृदा परीक्षण विषयावर व्याख्यान झाले. जिल्हा मृदा सर्वेक्षण व मृदा चाचणी अधिकारी एम. व्ही. लाटकर यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. लाटकर म्हणाले, दर्जेदार व भरघोस पिकाच्या उत्पादनासाठी प्रथम मातीचे परीक्षण वा चाचणी करणे गरजेचे आहे. मातीचे नमुने कसे व कोणत्या पद्धतीने किती प्रमाणात घ्यावेत, मातीमधील विविध तेरा गोष्टी संदर्भातील माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमाचे संयोजन रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डी. बी. पाटील यांनी केले. सिमरन धुडुभाई यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख मृणाल पाटील यांनी करून दिली. सूत्रसंचालन राजश्री सावंत यानी केले. अक्षय गुरव यांनी आभार मानले.